निम्न चुलबंद प्रकल्प, ता.साकोली व जि.
भंडारा या योजनेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय
मान्यता प्रदान करण्याबाबत

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ , नागपूर

महामंडळाचा निर्णय क्र. ०१ /विपाविम/कातां.२/निम्न चुलबंद प्रकल्प/द्वितीय सुप्रमा/(धा.क्र. २४/१८),
दिनांक : ०२/०१/२०१९

**पहावे :** महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/(३५/२०१५)/जसं(अ), मंत्रालय, मुंबई, दिनांक ९ सप्टेंबर २०१५

निम्न चुलबंद प्रकल्प ता. साकोली व जि. भंडारा या योजनेस शासन निर्णय क्र.१०९३/(२११/९३)/जसअ/मंत्रालय, मुंबई, दिनांक २९.०४.१९९५ अन्वये अंदाजित खर्च रु.४१६७.७३ (चार हजार एकशे सदुसष्ट लक्ष त्याहत्तर हजार फक्त) इतक्या किंमतीस (दरसूची १९९३-९४ वर आधारित) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

तद्नंतर महामंडळाचा निर्णय क्रमांक विपाविम/कांता.१/१६५२/प्रथम सुप्रमा/निम्न चुलबंद उसिंयो/२००८, दिनांक ३१.०३.२००८ अन्वये रु.११७१८.९० लक्ष (रु. अकरा हजार सातशे अठरा लक्ष नव्वद हजार फक्त) किंमतीस (दरसूची २००६-०७ वर आधारित) प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ भूसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल इतर कारणे व अनुषंगिक खर्चातील वाढ इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या १०% हून अधिक वाढत असल्याने योजनेस पुन्हा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये निम्न चुलबंद प्रकल्प, ता. साकोली, जि. भंडारा या योजनेच्या एकूण अंदाजित किंमत रु.१६७८२.०० लक्ष (एकशे सदुसष्ठ कोटी ब्यांशी लक्ष रुपये फक्त) खर्चास द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रु.१५३२७ लक्ष (एकशे (त्रेपन्न कोटी सत्तावीस लक्ष रुपये फक्त) कामाप्रित्यर्थ व रु.१४५५.०० लक्ष (चवदा कोटी पंचावन लक्ष) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या दरसूची प्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतूदीचा गोषवरा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**ठळक बाबी :-**

| | | |
|---|---|---|
| अ) योजनेचे सिंचन क्षेत्र | ... | ५९९७ हेक्टर |
| ब) योजनेचे सिंचन क्षमता | ... | ८८७६ हेक्टर |
| क) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | ... | १.९९ (मापदंड १.०० पेक्षा जास्त) |

हा निर्णय संदर्भामध्ये उल्लेखित शासन निर्णयातील परिच्छेद १.३ नुसार तसेच नियामक मंडळाच्या दिनांक ४.१०.२०१८ रोजी संपन्न ७१ व्या बैठकीत मान्य झालेल्या ठराव क्र.७१/५ चे अनुषंगाने सचिव उपसमितीने व राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्या क्र.२६ व २७ च्या पुर्ततेच्या अटीच्या अधीन राहून महामंडळास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.